क्रमांक –      /२०२५, दि.    /०४/२०२५
**पोलीस अधिक्षक कार्यालय,यवतमाळ**
एल.आय.सी.चौक,यवतमाळ,ता.जि.यवतमाळ
कार्यालय दुरध्वनी क्रमांक (०७२३२)२५६७००
Email ID - sp.yavatmal@mahapolice.gov.in

संदर्भ :- म.बा.वि.आ./बा.वि./का-५/अनधिकृत संस्था/२०२४-२५ पुणे, दि.१६/०४/२०२५.

विषय- यवतमाळ जिल्हयातील बालकांच्या अनधिकृत संस्थांविरोधात कठोर कारवाई करणेबाबत.

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, बेकायदेशिर बालगृहे,अनाथाश्रम चालविले जात असल्याच्या बातम्या प्रकाशित झाल्या आहे. वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झालेल्या बातम्यानुसार तसेच सदर संस्थेमध्ये बालकांना अनधिकृतपणे बालकांना डांबुन ठेवण्यात येवुन त्यांचे शिरिरीक,मानसिक आणि लैगिक शोषणाच्या घटना घडत असल्याबबातच्या बातम्या प्रसिध्द झालेबाबत निदर्शनास येत आहे. सदर बाब ही अत्यंत गंभीर स्वरुपाची असुन बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम,२०१५ आणि सुधारित अधिनियम २०२१ तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय नियम(मुलांची काळजी व संरक्षण),२०१८ मधील तरतुदींचे उल्लंधन करणा-या आहेत. त्यामुळे त्यावर वेळीच निर्बंध घालणे आवश्यक आहे.

तरी राज्यात ५२६ एवढया शासकिय व स्वयंसेवी संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात आलेले आहे. तसेच जिल्हास्तरावर आपल्या जिल्हयातील संबंधीत जिल्हा महिला बाल विकास अधिकारी यांचे कडे यादी उपलब्ध आहे. तरी यवतमाळ जिह्यात नोंदणीकृत असलेल्या एकुण १० संस्थांची नावे यासोबत जोडण्यात आलेली आहे. या संस्थां व्यतीरिक्त आपआपल्या पोलीस स्टेशन हदीत असलेल्या अनधिकृत संस्थांचा शोध घेवुन त्या संस्थांवर आपल्या पोलीस स्टेशन स्तरावर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाई चा अहवाल आमचे कार्यालयात सादर करावा.

**सहपत्रः-** १. महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे यांचे कडील परिपत्रक.
२. यवतमाळ जिल्हयातील १० संस्थांची यादी.

Kumar

( कुमार चिंता )
पोलीस अधीक्षक,यवतमाळ

प्रती,
सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी,यवतमाळ जिल्हा.
सर्व ठाणेदार,यवतमाळ जिल्हा.

1190

16 APR 2025

S.P. ........

Addl. S.P. ........

Dy. S.P.H.Q. ........

O.S. ........

H.C. ........

Branch ........

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -१.
२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.
ई-मेल dy.commissionercdc@gmail.com दुरध्वनी क्र. ०२०-२६३३०३७४

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मबाविआ/बा.वि/का-५/ अनधिकृत संस्था /२०२४-२५/ पुणे / २३९० दि. १६/०४/२०२५

प्रति,
मा.पोलीस अधिक्षक,
(सर्व)

विषय - राज्यातील बालकांच्या अनधिकृत संस्थाविरोधात कठोर कारवाई करणेबाबत . . .
संदर्भ - १.आळंदी पुणे येथील तसेच ठाणे जिल्हयातील अनधिकृत संस्थांमध्ये बालकांवर झालेले लैंगिक अत्याचार.

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित वृत्तपत्रामध्ये तसेच बेकायदेशीर बालगृहे, वसतिगृहे, अनाथाश्रम चालविले जात असलेबाबतच्या बातम्या प्रकाशित झालेल्या आहेत. वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झालेल्या बातम्यानुसार तसेच सदर संस्थांमध्ये बालकांना अनधिकृतपणे डांबून ठेवण्यात येवून त्यांचे शारिरीक, मानसिक आणि लैंगिक शोषणाच्या घटना घडत असल्याबाबतच्या बातम्या प्रसिध्द झालेबाबत निदर्शनास येत आहे. सदर बाब हि अत्यंत गंभीर स्वरुपाची असून बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ आणि सुधारित अधिनियम २०२१ तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या आहेत. त्यामुळे त्यावर वेळीच निर्बंध घालणे आवश्यक आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ आणि सुधारित अधिनियम २०२१ तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील तरतुदीनुसार काळजी व संरक्षणाची गरज असलेली अनाथ,निराधार,निराश्रीत, संकटग्रस्त,विधीसंघर्षग्रस्त असलेली ० ते १८ या वयोगटातील बालकांना अनुक्रमे बाल कल्याण समिती व बाल न्याय मंडळांच्या आदेशान्वये बालगृहात तसेच विधीसंघर्षग्रस्त बालकांना निरीक्षणगृहात दाखल करण्यात येते. या योजनेअंतर्गत बालकांना संरक्षण, संगोपन, शिक्षण, प्रशिक्षण, व्यवसायिक प्रशिक्षण, समुपदेशन, वैदयकीय इत्यादी सुविधा पुरवून त्यांच्या पुर्नवसनासाठी प्रयत्न केला जातो. यासाठी सदयस्थितीत राज्यामध्ये विभागामार्फत एकुण ५२६ एवढया शासकीय तसेच स्वयंसेवी संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले असून सदर संस्थांची जिल्हानिहाय यादी सोबत जोडलेली आहे. तसेच जिल्हास्तरावर आपल्याला संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याकडे उपलब्ध होईल. तसेच अशा मान्यता प्राप्त संस्थांना निर्गमित करण्यात आलेल्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत यासोबत नमुना म्हणुन माहितीस्तव पाठविण्यात येत आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ आणि सुधारित अधिनियम २०२१ मधील कलम ४२ नुसार मान्यता तथा सोबतच्या नोंदणी प्रमाणपत्राप्रमाणे नोदणी प्रमाणपत्र प्राप्त नसलेली संस्था अथवा अशी संस्था चालविणाऱ्या

4605

आ./जा.क्र./म.सु.व - 200/25
कार्यालय,पोलीस अधि
यवतमाळ दिनांक - 18/4/25

LHC-बिंडु 19/4/25

व्यक्तीला १ वर्ष कारावास तसेच रुपये १.०० लक्ष पेक्षा कमी नसेल एवढा दंड किंवा दोन्हीही करण्यात येईल अशी तरतुद नमुद करण्यात आलेले आहे.

त्यामुळे या पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, राज्यामध्ये आपल्या अधिनस्त प्रत्येक पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात अशा अनधिकृत संस्थांचा शोध घेणे व अनधिकृत संस्था आढळून आल्यास आपले स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व पोलीस स्टेशन मधील पोलीस अधिकारी यांना कारवाई करणेबाबतच्या सुचना देण्यात याव्यात. तसेच अशा प्रकारची तक्रार सामाजिक कार्यकर्ता, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, यांचे कडून प्राप्त झाल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करणे बाबतच्या सुचना संबंधित सर्व पोलीस अधिकारी यांना देण्यात याव्यात, हि विनंती.

आपली विश्वासू

(नयना अर्जुन गुंडे)भा.प्र.से.
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -
१. मा.सचिव,महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय मुंबई ३२.
२.मा.मंत्री महोदया, महिला व बाल विकास विभाग, यांचे खाजगी सचिव.
३.विभागीय उपआयुक्त,महिला व बाल विकास विभाग (सर्व)
४.जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | वाशिम | शंभुराजे बहुउद्देशीय संस्था सुरकुंडी ता जि वाशिम | २८.०८.२०२४ | ७ | विशेष दत्तक संस्था | adoption | मुला मुलींसाठी | १० | WAS-४/SAA/२०२४/५१० |

| अ.क्र | जिल्ह्याचे नांव | संस्थेचे नांव व पत्ता | ज्या आदेशान्वये मान्यता प्राप्त झाली तो आदेश क्र. व दिनांक | शा.नि.अनुक्रमांक | संस्थेचा प्रकार | | मुलांसाठी / मुलींसाठी | मंजुर संख्या | जावक क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | यवतमाळ | श्री रेणुका महिला विकास शिक्षण प्रसारक मंडळ माहुर जि. नांदेड द्वारा शरदचंद्र पवार बालगृह पोखरी. मा. महागाव जि. यवतमाळ | ८/३/२०१९ | ९५ | बालगृह | bal | मुलासाठी | ७ | YAV-१/CH/२०१९/४०२ |
| २ | यवतमाळ | महाबोधी बहुउद्येशिय संस्था, अमरावती द्वारा संचलित अशोका बालगृह क्र.१ वटफळी ता. नेर जि. यवतमाळ | ८/३/२०१९ | ९६ | बालगृह | bal | मुलासाठी | २० | YAV-२/CH/२०१९/४०३ |
| ३ | यवतमाळ | स्व. रमेश जाधव शिक्षण व क्रिडा प्रसारक मंडळ धुंदी ता. पुसद द्वारा संचलित स्व. विद्यारतन वडते बालगृह, धुंदी ता. पुसद जि. यवतमाळ. | ८/३/२०१९ | ९७ | बालगृह | bal | मुलीसाठी | २० | YAV-३/CH/२०१९/४०४ |
| ४ | यवतमाळ | ग्रामिण समस्या मुक्ती ट्रस्ट १६,साधनकर वाडी वणी ता. वणी जि. यवतमाळ संचलित आनंद बालसदन मु. पो. जळका, ता. मारेगाव, जि. यवतमाळ. | ८/३/२०१९ | ९८ | बालगृह | bal | मुलासाठी/ मुलीसाठी | ४० | YAV-४/CH/२०१९/४०५ |
| ५ | यवतमाळ | महाबोधी बहुउद्येशिय संस्था, अमरावती द्वारा संचलित अशोका बालगृह क्र.२ वटफळी ता. नेर जि. यवतमाळ | ८/३/२०१९ | ९९ | बालगृह | bal | मुलासाठी | २० | YAV-५/CH/२०१९/४०६ |
| ६ | यवतमाळ | स्व. रमेश जाधव शिक्षण व क्रिडा प्रसारक मंडळ धुंदी ता. पुसद द्वारा संचलित स्व. विद्यारतन वडते बालगृह, धुंदी ता. पुसद जि. यवतमाळ. | ८/३/२०१९ | १०० | बालगृह | bal | मुलासाठी | २८ | YAV-६/CH/२०१९/४०७ |
| ७ | यवतमाळ | ग्रामिण समस्या मुक्ती ट्रस्ट १६,साधनकर वाडी वणी ता. वणी जि. यवतमाळ संचलित आनंद बालगृह,मिलमिले आऊट पावर हाऊस मागे, लालगुडा वणी जि. यवतमाळ. | ८/३/२०१९ | १०१ | बालगृह | bal | मुलीसाठी | १५ | YAV-७/CH/२०१९/४०८ |
| ८ | यवतमाळ | स्व. हिरसिंग गोपा राठोड शिक्षण व क्रिडा बहुउद्येशिय सेवाभावी संस्था वरंदळी ता.दिग्रज संचलित बालगृह वरंदळी ता. दिग्रज जि. यवतमाळ. | ८/३/२०१९ | १०२ | बालगृह | bal | मुलासाठी | ३५ | YAV-८/CH/२०१९/४०९ |
| ९ | यवतमाळ | श्री. राजेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ कळसा ता. दिग्रज जि. यवतमाळ संचलित तुकाराम नाईक बालगृह कळसा ता. दिग्रज जि. यवतमाळ. | ८/३/२०१९ | १०३ | बालगृह | bal | मुलासाठी | ४२ | YAV-९/CH/२०१९/४१० |
| १० | यवतमाळ | श्रध्दा महिला बहूउद्देशिय शिक्षण व कला प्रसारक मंडळ, प्रभाग क्र. ९ राम मंदीर जवळ राळेगांव, जि यवतमाळ | ६/५/२०२० | २६४ | बालगृह | bal | मुलासाठी | २५ | YAV-१०/CH/२०२०/४११ |
| १० | यवतमाळ | ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट विशालनगर धामणगांव रोड मोहा जि यवतमाळ | २८.०८.२०२४ | ६ | विशेष दत्तक संस्था | adoption | मुला मुलींसाठी | १० | YAV-११/SAA/२०२४/५०९ |